# कोल्हापूर संस्थानातील नाट्य परंपरेचा ऐतिहासिक अभ्यास

**प्रशांत शहाजीराव पाटील,** संशोधक,इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना8**

आजच्या मराठी रंगभूमीचा उत्कर्ष नाट्य, साहित्य आणि संगीताच्या अंगाने उच्च पातळीला पोहोचला असला तरी हा नाट्य प्रवास अनेक स्थळ कालीन बदलातून झालेला आहे. रंगभूमीच्या अभ्यासकांनी मराठी रंगभूमीचा शोध धार्मिक सण, उत्सव, विधीनाट्यामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे. हेच समान सूत्र जागतिक रंगभूमीच्या उत्पत्ती बाबत देखील आढळते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर विष्णुदास भावे यांच्या पौराणिक नाटकांच्या रूपाने आधुनिक मराठी रंगभूमीचा उदय झाला. दशावतार, लळीत, बतावणी, भारुड, लावणी या कलांचा आस्वाद घेणाऱ्या तत्कालीन समाजाला पारंपारिक कलांमधील नृत्य, अभिनय, संगीत यांना देखील अधिक पसंती होती. अभिनयाची पसंती हळूहळू सांगली परिसराच्या आजूबाजूला आणि महाराष्ट्रभर पसरली. भावेंच्या अनुकरणातूनच कोल्हापूर संस्थानाच्या परिसरात नावाजलेल्या नाटक मंडळी अस्तित्वात आल्या. कोणत्याही समाजाचा सुसंस्कृतपणा तपासून पाहताना त्यांचा प्रादेशिक भूगोल, भाषेची अभिजातता, ऐतिहासिक वैभव आदी गोष्टींचा धांडोळा घेतला जातो. यासोबतच त्या समाजाची सांस्कृतिक स्थिती-गतीचा देखील अंदाज घेऊन त्या समाजाच्या उच्च अभिरुचीची आणि सांस्कृतिक जडणघडणीचे मापन करत असतो. अशी संस्कृतिक जडणघडण आणि कलाभीरूची यांचा संबंध आहे. या अन्योन्य संबंध कोल्हापूरच्या सांस्कृतिक परंपरेच्या बाबतीत चपखलपणे जुळून येतो. हा योग राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीमध्ये मोठ्या प्रमाणात घडून आला. संगीत, क्रीडा, चित्रकला, साहित्य, मल्लविद्या, नाट्य अशा सर्वच क्षेत्रांमध्ये नोंद घेण्याजोगे योगदान कोल्हापूर संस्थानाने दिले. या कलात्मकतेच्या अधिष्ठानावरच कोल्हापूरची गणना 'कलापूर' अशी होऊ लागली. नाट्यकलेच्या दृष्टीने कोल्हापूरला फार मोठी परंपरा लाभली आहे. त्यामुळे मराठी रंगभूमीच्या उदय,उत्कर्ष आणि अवनीतीच्या काळातील प्रत्येक टप्प्यामध्ये कोल्हापूरची रंगभूमी साक्षीदार आहे. कोल्हापूरची नाट्य परंपरा ही राजाश्रय आणि लोकाश्रेयाच्या मिश्र प्रतिसादातून विकसित झालेली पाहायला मिळते.

**कोल्हापूरची नाट्य परंपरा विष्णुदास भावे**

भावे यांच्या पाठीमागून पौराणिक नाटके करणाऱ्या ज्या कंपन्या झाल्या त्यात सांगलीकर, आळतेकर, इचलकरंजीकर, कोल्हापूरकर नाटक मंडळया उदयास आल्या. यापैकी काही कंपन्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापर्यंत टिकल्या होत्या. या सुरुवातीच्या कंपन्यांचा उदय सांगली व त्याच्या आसपासच्या भागात झाला. त्याचे कारण विष्णुदास भावे यांची कंपनी सांगलीची असल्यामुळे त्यांच्या आसपासच्या लोकांना नाटकाची माहिती प्रथम झाली व काही फुटाफुटीने व काही अनुकरणाने या भागात नवीन नाटक कंपन्या उदयास आल्या. या कंपन्यांनी जसे जसे महाराष्ट्रभर दौरे केले तशी लोकांना नाटकाची आवड व माहिती होऊ लागली. त्यातून इतर ठिकाणी देखील नाटक कंपन्या उदयास आल्या. १९४३ मध्ये विष्णुदास भावे यांच्या 'सीतास्वयंवर' नाटकाने मराठी रंगभूमीचा आरंभ होतो. कोल्हापूर संस्थानाच्या आजूबाजूला अनेक जहागिऱ्या, राजे,छोटी मोठी संस्थाने अस्तित्वात होती. सावंतवाडी, सांगली, इचलकरंजी, जमखंडी, कागल अशा अनेक दक्षिण मराठा संस्थानांचा प्रदेश होता. थोडक्यात स्वायत्तता गमावलेला तरीही मर्यादित अधिकाराखाली राजेशाहीचे अस्तित्व टिकून राहिलेला प्रदेश होता. ब्रिटिशांच्या वर्चस्वामुळे आक्रमण, युद्ध, लढायांचे रण मैदान पूर्णतः आकुंचन पावले गेले होते. अशावेळी पारंपारिक तमाशा, धार्मिककवनाने, बांधील असलेली लोकनाट्य अस्तित्वात होती. अस्थिर राज्यव्यवस्थेकडून ब्रिटिश नीतीमुळे स्थिर राज्यव्यवस्थेत सामूहिक मनोरंजनाची साधने अगदी त्रोटक असावीत. या राजकीय स्थिरतेतच नवी-नवी मनोरंजनाची साधने बहरली. त्यापैकी एक मराठी रंगभूमी होती. कोल्हापूर संस्थान परिसरात संस्थानी वातावरणामुळे निरनिराळया प्रकारच्या शर्यती, स्पर्धा, लढाईचे खेळ अस्तित्वात होते. रेडे, बैल, बकरे वगैरेच्या टकरा, बैलांची व कोंबड्यांची झुंज, गंजिफा असे प्रेक्षणीय सामने व खेळ कोल्हापुरात पूर्वापार चालत आलेले होते. अशा संस्थानी वातावरणात चित्तथरारक व रोमहर्षक खेळांसोबतच पांढरपेशी समाजाला राजकीय स्थिरता, प्रतिष्ठेसोबत मनोरंजनाच्या गरजेतून नाट्यकला घटकांना प्रोत्साहन मिळाले होते, हे अभिजन वर्गातील मनोरंजनाच्या सांस्कृतिक स्थित्यंतरांचा भाग म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मराठी रंगभूमीच्या उदय काळापासून कोल्हापूरच्या नाटक मंडळया आणि रंगकर्मींनी तिचा विकास आणि जोपासना केलेली होती. रंगभूमीच्या उदय आणि उत्कर्षाच्या टप्प्यामध्ये संस्थानिक, जहागीरदार, सामान्य रसिक, उद्योजकांनी अतिशय बहुमोल योगदान दिलेले आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर, कोकण, पुणे आणि इतर महाराष्ट्राचा एकूणच प्रदेश यांनी महाराष्ट्राच्या नाट्यकलेला बहार आणला.तसे पहिले तर एकूणच स्वातंत्रपूर्व महाराष्ट्राच्या रंगभूमीचा उदय आणि उत्कर्षाचे चार टप्पे पडतात. त्यामध्ये १९४३ ते १८८० हा उदयाचा टप्पा,१८८० ते १९१० हा नाविन्याचा टप्पा, १९१० ते १९३० हा मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाचा टप्पा तर १९३० ते १९५० हा बोलपटामुळे आणि इतर स्थित्यंतरांमुळे मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाला आलेली अवकळा आणि यातून तिने स्वतःला सावरण्यासाठी केलेल्या धडपडीचा टप्पा मानला जातो.[१] अभ्यासाच्या दृष्टीने कोल्हापूर संस्थान भारतामध्ये सामील होण्यापर्यंत कोल्हापूरच्या रंगभूमीचा प्रवास पाहिला तर त्याचे एकूण तीन टप्पे पडतात. हे टप्पे पाडण्या पाठीमागचा उद्देश एवढाच की, कोल्हापूरच्या रंगभूमीचा विकास आणि उत्कर्षाचा क्रम लक्षात यावा यातून रंगभूमीचे विषय रचना पद्धतीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे सोयीचे ठरेल. तसेच स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील कोल्हापूरच्या कलावंतांचा रंगभूमी

विकासासाठीचे योगदान देखील समजून येईल. कोल्हापूरच्या मराठी रंगभूमीचे एकूण तीन टप्पे पडतात. हे संस्थानकालीन उगम व उत्कर्षाचे टप्पे एकूणच महाराष्ट्राच्या रंगभूमीला पूरक ठरतात. यामध्ये राजर्षी शाहूपूर्व कालखंड १८४९ ते १८९४, दुसरा राजर्षी शाहू कालखंड १८९४ ते १९२२ आणि तिसरा राजर्षी शाहुत्तोर कालखंड १९२२ ते १९४९ या कालखंडामध्ये कोल्हापूरची मराठी रंगभूमी उगम आणि उत्कर्षास आली.

**राजर्षी शाहुपूर्व कालखंड आणि कोल्हापूर संस्थान (१८४९ ते १८९४)**

राजर्षी शाहुपूर्व कालखंडामध्ये कोल्हापूरची रंगभूमी उदय पावलेली होती. अनेक तज्ज्ञांच्या मते देखील शिवाजी महाराज तिसरे उर्फ बाबा महाराज( १८३८ ते १८६६), राजाराम महाराज( १८६६ते १८७०) व शिवाजी महाराज चौथे (१८७९ ते १८८३) तसेच दिवाण बर्वे यांच्या संमिश्र कालखंडामध्ये कोल्हापूरची रंगभूमी उदयास आली होती. उपलब्ध पुराव्यावरून विष्णुदास भावे यांच्या नाटकांचे खेळ १८५१ मध्ये कोल्हापूरच्या गरुड मंडपात झाल्याचा उल्लेख आढळतो. परंतु त्यापूर्वी देखील त्यांनी आपल्या नाटकांचे खेळ कोल्हापुरात सादर केलेले असावेत. कारण त्यांच्या अनुकरणातून स्थापन झालेल्या इचलकरंजीकर नाटक मंडळीची स्थापना १८४९ ला आढळते. अर्थात, या मंडळीपूर्वी कोल्हापूरच्या संस्थानी प्रदेशात नाटक मंडळी स्थापन झाली आणि नाटकाचे खेळ झालेले संदर्भ उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे इचलकरंजीकर नाटक मंडळीच्या स्थापना कालखंडापासून कोल्हापूरच्या रंगभूमीच्या उदयाचा कालखंड गृहीत धरला जातो.१८४९ पासून राजर्षी शाहू महाराजांच्या दत्तकविधानापर्यंतचा कालखंड म्हणजे कोल्हापूरच्या रंगभूमीच्या उदय आणि नाट्यपरंपरा स्थिर होण्याचा कालखंड गृहीत धरावा लागतो. कारण याच कालखंडात ज्या भावेंच्या अनुकरणातून नाटक मंडळया उदयास आल्या त्यामध्ये इचलकरंजीकर नाटक मंडळी सोबतच आळतेकर आणि नरहरबुवा सवाशे उर्फ कोल्हापूरकर यांची कोल्हापूरकर नाटक मंडळी होती. विष्णुदास भावे नंतर ज्या नाटक मंडळी अस्तित्वात आल्या, त्यामध्ये बहुतांश पौराणिक नाटकांसोबत संस्कृत नाटकांचे मराठी रूपांतर करून सोबतच संस्कृत नाटकांचे मराठी रूपांतरण करून नाटके सादर होत असत. १८५९ मध्ये परशुराम पंत गोडबोले यांनी 'उत्तररामचरित्र' चे मराठीत भाषांतर करून नाटक लिहिले. त्यासोबतच गणेशशास्त्री लेले , कृष्णशास्त्री राजवाडे, शिवरामशास्त्री पाळंदे अशांनी संस्कृत नाटकांचे मराठीत रूपांतरण केले होते. या कालखंडातच इंग्रजी नाटकांचे मराठीत रूपांतरण करून नाटके सादर करण्याचा प्रभाव आला होता. तसे पाहिले तर मराठी रंगभूमीचे जनक विष्णूदास भावे आणि कोल्हापूरचा निकटचा संबंध आहे. १८८० साली दिवाण बहादूर माधवराव बर्वे यांनी विष्णुदास भावे यांची कळंबे तलावावर नेमणूक करून त्यांना नोकरीस ठेवले. हाच या नाटकाचा पहिला कोल्हापूरशी संबंध असे बाबुराव देशपांडे म्हणतात.[२]

परंतु यापूर्वी देखील विष्णुदास भावे कोल्हापूरमध्ये येऊन खेळ केल्याचे दाखले मिळतात. अप्पाजी कुलकर्णी लिखित 'मराठी रंगभूमि' मध्ये लिहितात की, १८५१ मध्ये चिंतामणराव पटवर्धनांचा मृत्यू झाल्यानंतर भावेंचा राजाश्रय तुटला असता संस्थानाचे कारभारी बाळाचीपंत माटे यांनी राजा अल्पवयीन असल्याने स्वतःच्या जबाबदारीवर विष्णुदास भावे यांना मदत नाकारली. परंतु, भावे व त्यांच्या नाटक कंपनीतील जे सहकारी नोकर होते त्यांचा चार वर्षाची बदली रजा देण्याचे आश्वासन दिलेले दिसते. त्यामुळे १८५१ या वर्षापासून भावे यांनी आजूबाजूच्या परिसरात नाटके सादर करण्यास सुरुवात केली. भावेंनी सांगलीनंतर पहिला मुक्काम १८५१ रोजी कोल्हापूर येथे खेळ सादर केला.कोल्हापूर येथे श्री अंबाबाईच्या देवळातील गरुड मंडपात व सरकारी वाड्यात काही खेळ केल्यानंतर प्रवासाच्या भाड्याची सोय करून पुण्याला गेले.[३] यावरून हे स्पष्ट होते की, विष्णुदास भावे यांनी १८७५ च्या पूर्वी कधीतरी आपली नाटक मंडळी मोडली असावी. याचा दुजोरा अप्पाजी कुलकर्णी यांच्या पुस्तकांमध्ये मिळतो. यानुसार विष्णुपंतांनी नाटक मंडळी मोडल्यानंतर कळसूत्री बाहुल्यांचा नाटकाप्रमाणे खेळ तयार केले होते. अर्थात, हा खेळ१८७९च्या सुमारास कोल्हापुरात झाल्याची देखील नोंद मिळते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, १८७५पूर्वी केव्हातरी विष्णुदास भावे यांनी आपली नाटक मंडळी मोडली असावी. नंतर त्यांनी सांगली येथे इंजीनियरिंग खात्यात नोकरी केली. म्हणजे१८७५ ते १८८० च्या दरम्यान विष्णुदास भावे हे कोल्हापूरचे दिवाण बर्वे यांनी दिलेल्या नोकरीनिमित्त भावे हे कोल्हापुरात रहिवास करीत असावेत.[४]

**इचलकरंजीकर नाटक मंडळी (१८४९)**

१८४९-५० मध्ये सरकारी दाप्तरावरून ही मंडळी स्थापन झाल्याचे दिसून येते.[५] इचलकरंजीकर कंपनीचे मूळ उत्पादक रा. चिमण भट व नारायण भट असे दोघे भाऊ होते आणि पुढे त्याचे चालकत्व अंताजीपंत ताम्हणकर व बाळंभट यांच्याकडे गेले अशी नोंद अप्पाजी कुलकर्णी देतात आणि तीच परंपरा पुढील इतिहास लेखकांनी घेतल्याची दिसते.[६] परंतु मोटे ह. वि. यांनी संपादित केलेल्या 'विश्रब्ध शारदा' खंड दोन मधील पत्रसंग्रहातील उल्लेखावरून चिमणभट अशा नावाच्या व्यक्तीचा उल्लेख मिळत नाही, तसेच नारायण भट अशा नावाचा शोधांती या कंपनीत नारायण नावाच्या तीन व्यक्ती आढळतात. त्यात नारायण बापट, नारायण लेले, नारायण देशपांडे अशी त्या व्यक्तींची नावे आहेत. त्यामुळे इचलकरंजीकर नाटक मंडळीच्या नेमक्या मालकाबद्दल स्पष्टता होत नाही. तसेच पुढे या कंपनीचे चालकत्व अंताजीपंत ताम्हणकर व बाळंभट यांच्याकडे गेले असे ते म्हणतात. या दोन व्यक्ती मोटे यांच्या संपादित पत्र संग्रहावरून अंताजी ताम्हणकर म्हणजेच अंताजी बल्लाळ करंदीकर व बाळंभट म्हणजे बाळाजी दिनकर जोशी किंवा बाळकृष्ण पांडुरंग नातू या दोघांपैकी एक असावेत.[७]

या मंडळीत विष्णू मोरेश्वर महाजनी यांचे 'तारा' 'भ्रांतीकृत चमत्कार' विनायक कीर्तने यांचे 'थोरले माधवराव पेशवे' (१८६१) जयपाल (१८६३)[८] 'शाकुंतल' 'शांकर दिग्विजय' 'वेणीसंहार', 'नारायणराव पेशव्यांचा व कोणी मुकदम्याचा फार्स' अशा नाटकांचे देखील सादरीकरण होत होते.[९]

**सप्तप्रधान मंडळाद्वारे नाटक मंडळीचा कार्यभार**

विष्णुदास भावे परंपरेतील इचलकरंजीकर नाटक मंडळीची कारकीर्द अधिक प्रभावी आणि प्रदीर्घ म्हणजे चाळीस वर्षे राहिलेली होती, त्याला कदाचित त्यांचे व्यवस्थापक मंडळाची भिस्त आणि शिस्त कारणीभूत असेल. २४ मार्च १८८४ च्या पत्रानुसार या मंडळीतील प्रमुख नटाने १८८४ साली संस्थेचा कारभार चालविण्यासाठी सात प्रधानांची नेमणूक केली होती.[१०] या पत्रात दिलेल्या सात असामी पंच म्हणून कामे करण्याचा नऊ कलमी ठराव केला आहे. या ठरावाद्वारे कंपनीचे व्यवहार आणि कार्य सात मंडळींमध्ये विभागून दिले गेले होते. या सात मुख्य व्यक्तींमध्ये शिवरामबुवा भाऊबुवा सोमन, बाळाजी दिनकर जोशी, वासुदेव बल्लाळ पेंडसे, भास्कर नारायण गाडगीळ, नारायण गोविंद बापट, रामचंद्र विठ्ठल भिडे अशा सात लोकांची कार्यकारिणी नेमलेली दिसते. यांच्याद्वारे आर्थिक, व्यवस्थापकीय अंतर्गत वाद विवाद अशा कार्यांच्या वाटपाचे काम चालत होते. २८ मे १८८८ रोजीचे बडोद्यावरून या मंडळीला आलेल्या पत्रावर या कंपनीची एकी (Coordination) किंवा संघटन (Management) यांची शिक्षा( तालीम) व त्यानुसार नटांचे वर्तन ठेवण्याची इच्छुकता फार चांगली असल्याची नोंद मिळते. नटांची सभ्यता, सुशीलता, मर्जी राखण्याची तत्परता वाखाण्यासारखी असल्याची या पत्रात दखल घेतलेली दिसते.[११]

**आळतेकर नाटक मंडळी**

कोल्हापूरच्या जवळील आळते गावच्या व आजूबाजूच्या नटांनी 'आळतेकर नाटक मंडळी' स्थापन केली होती. या मंडळीचा संस्थापक, नट आणि व्यवस्थापकांची नावे स्पष्ट होत नाहीत. परंतु ही मंडळी देखील विष्णुदास भावेंच्या अनुकरणातून अस्तित्वात आलेली दिसते. या मंडळीने देखील पौराणिक आणि ऐतिहासिक नाटकांची परंपरा जपलेली दिसते. पौराणिक नाटकांच्या परंपरेतील या मंडळीतील नटांनी संस्थेच्या व्यवस्थापकास १८७५ साली लिहिलेल्या पत्रावरून नटांची सुशिक्षणाची आणि सुव्यवस्थेची अपेक्षा दिसून येते. त्याकरिता रंगभूमीवरील भूमिकेप्रमाणे संस्थेच्या बिऱ्हाडातील रोजची कामे करण्याची सुद्धा त्यांची तयारी होती. बाजारहाट, स्वयंपाक आणि रोजच्या जेवणावळीतील उष्टी काढणे वगैरे कामाची सुद्धा विभागणी कशी असावी ते त्यांनी मोकळ्या मनाने सुचविले आहे. मारुतीला २०० नमस्कार घालण्याची शिक्षा आणि कर्जरोख्यांना सही न गुंतवण्याची सावधगिरी या गोष्टी मनोरंजक आहेत. यांच्या शिक्षा देखील आरोग्यदायी व्यवहार दिसतो. संस्थेचे कार्य आणि जीवन सुरळीतपणे आणि शिस्तीत चालावे ही इच्छा प्रस्तुत पत्रात दिसते.[१२]

**चित्तचक्षूचमत्कारिक कोल्हापूरकर नाटक मंडळी( १८६१)**

कोल्हापुरात नरहरबुवा सव्वाशे उर्फ कोल्हापूरकर यांनी ही मंडळी स्थापन केली. या कंपनीत विनायक कवठेकर (वाई), राघोबा शेणवी, रामभाऊ साने, गोविंदराव देवस्थळी ही नटमंडळी होती. नरहरबुवा कोल्हापूरकर हे १८६०-६१ दरम्यान नारायणराव कारखानीस यांच्या कोल्हापूरकर हिंदू नाटक मंडळीतून बाहेर पडून स्वतःची चित्तचक्षुचमत्कारिक नाटक मंडळी काढली. कोल्हापुरात नारायणराव कारखानीस यांनी पहिली नाटक मंडळी काढली असली तरी कोल्हापूरच्या नाट्यपरंपरेला वृद्धिंगत केले ते नरहर गोपाळ सरडे उर्फ नरहरबुवा कोल्हापूरकर यांनीच, इचलकरंजीकर नाटक मंडळी प्रमाणे ही मंडळी देखील पौराणिक नाटकांकडून बुकीश नाटकांकडे वळली होती. १८७१ ला या मंडळीने ठाणे येथे रघुनाथ शंकर अभ्यंकर लिखित 'स्वैरसकेशा' नाटकाद्वारे बालवृद्ध विवाहाच्या दुष्परिणामांची दर्शन घडवले होते.[१३] या नाटकांप्रमाणेच 'पारिजातक' 'दुर्गा' 'द्रौपदी वस्त्रहरण' 'शुक- रंभा संवाद' 'संगीत संभाजी' 'राधा विलास' 'शंकर दिग्विजय' 'संगीत शाकुंतल' अशी अनेक नाटके या मंडळींनी सादर केली होती. कोल्हापूर संस्थानात सरन्यायाधीश असलेले बळवंत नारायण जोशी व गणेश बळवंत जोशी यांचे या कंपनीला बरेच सहकार्य असे. कोल्हापूरचे नारायण गोपाळ उर्फ आप्पासाहेब फाटक हे उत्कृष्ट शिक्षक या कंपनीच्या नाटकांच्या तालमीत घेत. नरहरबुवांच्या कंपनीने त्याकाळी सर्व भारतभर प्रवास केला होता. मद्रास, बंगलोर, काशी व इतर ठिकाणी जाऊन मराठी रंगभूमी गाजविली होती.[१४] १८९३-९४ दरम्यान ही नाटक मंडळी बंद पडली आणि १८९८ मध्ये कोल्हापूरचे नावलौकिक करणाऱ्या नरहरबुवा सवाशे यांचे निधन झाले.[१५] एकूणच शाहुपूर्व कालखंडातील नाटक मंडळींचे सादरीकरण स्वरूप पाहिले तर आपल्याला असे दिसून येते की, पौराणिक नाटकाप्रमाणेच बुकीश नाटकांमध्ये संस्कृत प्रमाणेच इंग्रजीतून भाषांतरित झालेल्या नाटकांचे सादरीकरण होत असे. पौराणिक नाटकांची कथानके पुराणातील आख्यानावर आधारित असल्यामुळे ती प्रेक्षकांना अगदीच परिचित असत. त्यामुळे परिचित कथानकाच्या नाटकांना या काळातील प्रेक्षकांनी प्राधान्य दिलेले दिसते. १८६० नंतर फार्सच्या स्वरूपात ऐतिहासिक नाटके लिहिण्या आणि सादरीकरणास सुरुवात झालेली होती. राजर्षी शाहुपूर्व कालखंडामध्ये विष्णुदास भावेंच्या पौराणिक नाटकांचे अनुकरण करून ज्या आद्य नाटक मंडळी कोल्हापूर परिसरात उभारल्या गेल्या. त्यामध्ये इचलकरंजीकर व आळतेकर नाटक मंडळीचा समावेश होतो. पुढे त्या दोघांचे अनुकरण करून व फुटीतून कोल्हापूरकर नाटक मंडळी अस्तित्वात आली. या कालखंडातील नाटकांचे स्वरूप पाहिले तर सुरुवातीला पौराणिक नाटके जी लढाया, युद्ध, पुराण कथाभागातील प्रसिद्ध प्रसंगांना समोर ठेवून प्रेक्षकांपुढे सादर करत. सूत्रधार व विदूषकांवर नाटकांची सर्व मदार अवलंबून होती. पुढे ती कमी कमी होत गेली अर्थात, याला नवशिक्षित तरुणांचा हातभार शैक्षणिक संस्थांचे प्रोत्साहन (राजाराम कॉलेज), काही प्रमाणात इंग्रजी राजवटीचा प्रभाव कारणीभूत असावा. याच काळात नाट्यकृती, पडदे, नेपथ्यात

बदल झाले आणि कवणांच्या रूपाने नाट्यगीत उभारणीस येत गेले. पुढे अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी मराठी रंगभूमीला नाट्यगीत व संगीतादी रूपात नवीन आयाम चढवला. वास्तविक मराठी रंगभूमीच्या उभारणीच्या कालखंडात कोल्हापूरच्या नवकलाकारांनी मराठी रंगभूमीच्या उत्कर्षात मोलाची कामगिरी बजावली. या कालखंडात कोल्हापूरच्या राजवटीचे कितपत योगदान व प्रोत्साहन मिळाले. याचा अंदाज बांधणे पुराव्या अभावी कठीण आहे परंतु या काळातील नाटक मंडळीच्या व्यवस्थापनाचे स्वरूप नाट्यकृतीच्या सादरीकरणातील व आशियातील बदल स्पष्ट होतात.

**राजर्षी शाहू कालखंड (१८९४ ते १९२२)**

राजर्षी शाहू महाराजांना उणेपुरे ४८ वर्षाचे आयुष्य लाभले असले तरी त्यांच्या विविधअंगी, बहुमोल, दर्जेदार, अचूक दृष्टीमुळे व मौलिक स्वरूपाच्या कार्यामुळे त्यांची कारकीर्द गाजली. राजकीय, सामाजिक, आर्थिक, नाट्य, क्रीडा वा इतर कला अशा मानवी जीवनाशी निगडित विविधअंगी घटकांना पूरक ठरणारे कार्य केले. हे कार्य त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवघ्या २८ वर्षात केले. राजर्षी शाहू महाराजांच्या सर्वत्रिक कार्याप्रमाणेच नाट्यकलेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन मराठी रंगभूमीच्या विकासासाठी मौलिक ठरले. वास्तविक, राजर्षी शाहू महाराजांनी अधिकारसूत्रे हाती घेण्यापूर्वी साधारण अर्ध शतकापूर्वी महाराष्ट्राच्या मराठी रंगभूमीने मार्गक्रमण केलेले होते. परंतु कोल्हापूरच्या नाट्यकलेच्या विकासाच्या वा एकूणच मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाला कोल्हापूर संस्थान व आजूबाजूचा परिसर पूरक ठरला. राजर्षी शाहुपूर्व कालखंडामध्ये तमाशे, कीर्तन, लावणी, साकी, दिंडी, फटका, वाघ्या- मुरळी, भजन इत्यादी लोक संगीतातील प्रकार रूढ होते. हे पारंपारिक वाद्यवृंद, लोकसंगीत, विधी घटकाशी संबंधित असले तरी त्यांचा नाट्यकलेशी असलेला संबंध तोडता येत नाही. संगीतादी कलांना व कलावंतांना कोल्हापूर संस्थानातील श्रीमंत सावकार, सरदा,र जहागीरदार मंडळींनी देखील आश्रय दिलेला होता. अर्थात, नाटक कंपनीचा व्याप आणि विस्तार अधिक असला तरी मनोरंजन वा मान सन्मान, प्रतिष्ठा दर्शवणारा हा कला घटक होता. राजर्षी शाहू महाराजांनी नाट्यकलेला प्रोत्साहन तर दिलेच त्यासोबत प्रस्तुत कला घटकांमध्ये जातिवंत कलावंतांनाही हेरून त्यांना त्यामध्ये काम करण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या. संस्थानी मदत, उदार आश्रय देऊन त्यांच्या कार्यशीलतेला अधिक गती दिली. 'स्वदेशहीचिंतक नाटक मंडळी' 'महालक्ष्मीप्रासादिक नाटक मंडळी' 'कोल्हापूरकर संगीत मंडळी' 'सामाजिक नाटक मंडळी' 'शिवराज नाटक मंडळी' सारख्या नाट्यकलेला वाहून घेतलेल्या मंडळींना प्रोत्साहनासाठी राजदरबाराचा उदार आश्रय पुरविला. अर्थात, शाहू महाराज नाट्यकलेबाबत रसिक व हौशी असल्यानेच हा राजाश्रय लाभला होता. त्यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये मोलाची कामगिरी बजावली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. १९४३ मध्ये कोल्हापूर येथे आयोजित केलेल्या शताब्दी महोत्सवाचे अध्यक्षस्थान भूषवलेले भा.वि. उर्फ मामासाहेब वरेरकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये कोल्हापूरच्या नाट्यपरंपरेचे महत्त्व विशद करताना म्हटले होते की, "मराठी रंगभूमीच्या इतिहासात कोल्हापूरचे स्थान अनन्यसाधारण आहे. सांगली संस्थानात मराठी रंगभूमीचे पुनरुज्जीवन १८४३ साली जरी झाले असले तरी त्याला बिजारोपणाइतकेच महत्त्व आहे. मराठी रंगभूमीची जी वाढ झाली त्या वाढीला पोषक अशी जोपासना झाली ती कोल्हापूर क्षेत्रातच"[१६] मामा वरेरकरांनी उद्गारलेले वाक्य इतिहासामध्ये पडताळणी करून पाहिले तर मराठी रंगभूमीच्या बीजारोपणापासून उत्कर्षाच्या काळापर्यंतच्या टप्प्यात कोल्हापूरचे रसिक, राजे रजवाडे, कलावंत, नट, नाटककार यांचा अत्यंत मोलाचा वाटा असलेला दिसून येतो. मग अगदी सुरुवातीच्या टप्प्यातील विष्णुदास भावेंचे अनुकरण करणारे कोल्हापूर व त्याच्या परिसरातील इचलकरंजीकर नाटक मंडळी, आळतेकर नाटक मंडळी व कोल्हापूरकर नाटक मंडळी पाहिली तरी त्यांचे या कालखंडातील योगदान मोलाचे होते असे दिसून येते. राजर्षी शाहू कालखंडात स्वदेशितचिंतक, सामाजिक, शिवराज, यशवंत, बळवंत, ललितकलादर्श व किर्लोस्कर नाटक मंडळी यांचा इतिहास पाहिला तर आपणास सहज लक्षात येते की, भागीदारी व मालकी असलेल्या नाटक मंडळींना नट, नाटककार यांना मदतीच्या स्वरूपात कोल्हापूर हे उदारपणे कलेला आश्रय व प्रोत्साहन देण्यात अग्रेसर राहिलेले होते. राजर्षी शाहू कालखंडामध्ये राजाश्रय लाभलेल्या स्वमालकीच्या आणि भागीदारी स्वरूपात उभारल्या गेलेल्या अनेक नाटक मंडळी होऊन गेल्या. यातील काही नामवंत नाटक मंडळांनी तर महाराष्ट्र आणि महाराष्ट्र बाहेर देखील कोल्हापूर संस्थानाचा नावलौकिक केला होता. त्यातील काही नाटक मंडळी आपणाला पाहता येतील.

**करवीर निवासिनी नाटक मंडळी / श्रीमहालक्ष्मीप्रासादिक संगीत मंडळी**

कोल्हापूरच्या दत्तोपंत हल्याळकर यांनी १८९८ मध्ये करवीर निवासिनी नाटक मंडळीची स्थापना केली होती. तिचेच १९०० मध्ये 'श्रीमहालक्ष्मीप्रासादिक संगीत मंडळी' असे नामकरण करण्यात आले होते. आपल्या अमौलिक नाट्य गुणांनी दत्तोपंतांन या नाटक मंडळीचा नावलौकिक केला होता. स्त्री भूमिका करणारे दत्तोपंत हल्ल्याळकर, कृष्णा भंडारकर, नारायण बेंदूर तसेच चिंतोपंत गंधे, विठ्ठलराव साखरीक,र चिंतोबा पेठे, बळवंतराव पेठ , तात्यासाहेब बडोदेकर अशा मंडळी देखील या कंपनीत होत्या. 'संगीत शाकुंतल' 'रामराज्यभियोग' 'शापसंभ्रम' 'विरतनया' 'संगीत शारदा' इतर नाटके या कंपनीने उत्कृष्टरित्या सादर केली होती.[१७]

**सामाजिक नाटक मंडळी**

१८८१-८२ मध्ये सुपेकर व इतर भागीदार यांनी शाहूनगरवासी नाटक मंडळी स्थापन केली होती.[१८] जरी या नाटक मंडळीच्या नावांमध्ये शाहूनगरवासी असा उल्लेख असला तरी हे नाव कोल्हापूरच्या राजर्षी शाहूंशी निगडित नसून 'शाहूनगर' हे साताऱ्याला उद्देशून दिलेले होते.[१८] ही नाटक मंडळी मराठी गद्य नाटके सादरीकरण करण्यामध्ये अग्रस्थानी होती. याच नाटक मंडळीचे अनुकरण करणारी सामाजिक नाटक मंडळी १९०२ मध्ये कोल्हापूर येथे स्थापन झाली होती. या नाटक मंडळींमध्ये रामभाऊ गोखले,

आबा लिमये, अंतोबा व नानबा गोखले हे रंगकर्मी या मंडळीत होते.[१९] दैनिक प्रभातच्या दिवाळी अंकातील लेखांमध्ये गोविंदराव टेंबे यांनी लिहिलेल्या लेखानुसार ही मंडळी कोल्हापूरची होती हे स्पष्ट होते तसेच याची मालकी विनायकराव कानिटकर यांच्याकडे होती. कदाचित ही नाटक मंडळी भागीदारी स्वरूपात चालवली गेली. यात कोल्हापूरचे व कोल्हापूरबाहेरचे भागीदार सामील असावेत. पुढे नानबा गोखले यांनी या कंपनीतून बाहेर पडून स्वतःची 'लोकमान्य नाटक मंडळी' काढलेली दिसते. सामाजिक नाटक मंडळीतील वेदोक्त प्रकरणाच्या नाटकावरून संस्थानात बराच गोंधळ झाला होता. या मंडळीचा पहिला प्रयोग शिरवळकरांच्या 'श्रीतुकाराम' नाटकाने झाला होता. पुढे हे नाटकच वेदोक्त प्रकरणाच्या प्रसंगामुळे वादात अडकले. या नाटक मंडळीने सादर केलेल्या 'श्रीतुकाराम' नाटकातील वेदोक्त प्रकरणाच्या प्रसंगावरून दरबार, पॉलिटिकल एजंट, ब्रिटिशांचे गृहखाते प्रमुखापर्यंत वाद जाऊन देखील २० जून १९०८ च्या ठराव नंबर २१ नुसार या कंपनीला शाहू महाराजांनी राजाश्रय दिलेला दिसतो.[२०] सामाजिक नाटक मंडळीला राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय दिल्यानंतर च्या एकावर्षानेच कोल्हापूरचे सुपुत्र केशवराव भोसले यांनी स्वदेशितचिंतक नाटक मंडळीतून बाहेर पडून सुरुवातीच्या काळात काही भागीदार घेऊन स्वतःची ललितकलादर्श नाटक मंडळी स्थापन केलेली दिसते. इतिहासातील दाखल्यावरून राजर्षी शाहू महाराजांना केशररावांच्या नाटक मंडळीला दरबाराचा खास राजाश्रय द्यायचा होता. परंतु ही मंडळी शेवटपर्यंत लोकाश्रयाच्या आधारावरच राहिलेली दिसते.

**ललितकलादर्श नाटक मंडळी**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रामध्ये ज्या काही मोजक्या नामांकित नाटक मंडळी होऊन गेल्या त्यामध्ये केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्श नाटक मंडळीचे नाव घ्यावे लागते. ललितकलादर्श नाटक मंडळीचा प्रवास एकूण तीन रंगकर्मींच्या कारकीर्दीने प्रवाहित राहिलेला दिसून येतो. पहिल्या टप्प्यामध्ये केशवराव भोसले यांच्या कालखंडामध्ये १९०९ ते १९२१, दुसऱ्या टप्प्यात नानासाहेब चापेकर काही काळ तर पुढे कंपनीचे संपूर्ण संचलन बापूराव पेंढारकरांनी १९२४ ते १९३६ पर्यंत त्यांनी ललितकलेला अखंडपणे प्रवाहित ठेवलेले दिसते. तिसऱ्या टप्प्यात ललितकलेचे पुनरुज्जीवन करून भालचंद्र पेंढारकर यांनी ही परंपरा सुरू ठेवलेली होती. बालगंधर्वांप्रमाणे केशवराव यांनी मराठी रंगभूमीला उत्कर्षाच्या शिखरावर पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतानाच ४ ऑक्टोबर १९२१ रोजी पुणे येथे विषमज्वराच्या आजारामुळे केशवरावांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर देखील बापूराव पेंढारकर यांच्या कालखंडामध्ये कंपनीची सधनता कमी झाली नाही. १ जानेवारी १९२३ मध्ये तर कंपनीने मुंबईच्या ग्रँड रोड वरील नोवेल्टी थिएटर दरमहा ५००० रुपये भाडे देऊन तीन वर्षासाठी घेतले होते.[२१] या नाटक मंडळीने देवलांपासून वीर वामनराव जोशी पर्यंतच्या अनेक जुन्या व नव्या नाटककारांची नाटके रंगभूमीवर उत्कृष्टपणे सादर केली होती. मनोरंजनासोबतच राष्ट्र कार्यामध्ये सहभागी होऊन राष्ट्रीय बांधिलकी जपण्यासही या काळातील नाटक मंडळींनी आपला सहभाग दर्शवला होता. १९२५ मध्ये बेळगाव येथे राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनावेळी या कंपनीने 'संन्याशाचा संसार' चे खास खेळ करून मिळालेले उत्पन्न राष्ट्र कार्यासाठी अर्पण केलेले दिसते. कर्नाटक पद्धतीची पदे या कंपनीत जास्त होत असत त्यामुळे हुबळी, धारवाड, बेळगावच्या रसिकांना देखील कंपनीचे खेळ भावत असत. कर्नाटकातील सरस्वती हनगल, गायिका गंगासानी, अनंताप्पा अशांनी कंपनीतील काही नाटकांना कर्नाटकी चालीची पदे दिली होती. त्यामुळे केशवराव भोसले आणि नानासाहेब जोगळेकर या दोघांनी कर्नाटक संगीत पद्धतीला मराठी वळण दिले होते असे मामा वरेरकर म्हणतात.[२२] याअर्थी असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही की, मराठी नाटक मंडळांमध्ये ललितकलादर्श मंडळी भाषिक व सांस्कृतिकतेला सामावून घेणारी नाटक मंडळी होती. केशवराव भोसले यांच्या ऐन उमेदीच्या आणि उत्कर्षाच्या कालखंडातच राजर्षी शाहू महाराजांच्या आज्ञेवरून त्यांच्या खास राजाश्रयाखाली आणि गोविंदराव टेंबे यांच्या नेतृत्वात 'शिवराज नाटक मंडळी' नोव्हेंबर १९१५ रोजी पुणे येथे स्थापन झाली होती.[२३]

**शिवराज नाटक मंडळी (१९१५ ते १९२१)**

राजर्षी शाहू महाराजांनी अधिकारसूत्रे हाती घेतल्यापासून अनेक नाटक मंडळांना राजाश्रय दिलेला दिसतो. शिवराज नाटक मंडळीपूर्वी त्यांनी सामाजिक नाटक मंडळीला राजाश्रय दिला होता. परंतु शाहू महाराज हे अतिशय शिस्तप्रिय आणि राजाश्रय प्राप्त नाटक मंडळीला गुणात्मकतेच्या बाबतीत कसलीच सुट त्यांना अपेक्षित नव्हती. तेव्हा सामाजिक नाटक मंडळी १९१४-१५ दरम्यान बंद पडल्यानंतर शाहू महाराजांनी या कंपनीचे सर्व साहित्य, सामान-सुमान शिवराज नाटक मंडळीला दिले आणि नव्या-जुन्या संचाच्या माध्यमातून शिवराज कंपनीची उभारणी झाली.[२४] बाबुराव पेंटर सारखे ख्यातनाम कलावंत या कंपनीचे सिनसीनरी, पडदे वगैरे तयार करण्यासाठी होते. हा देखील राजाश्रयाप्रमाणेच एक प्रकारचा लौकिक या मंडळीसाठी होता. या कंपनीला खेळ करता यावेत, नाटकांच्या तालमी घेता यावेत म्हणून महाराजांनी जुन्या राजवाड्यातच काही काळासाठी सोय केली होती. त्यानंतर त्यांची स्वतंत्र सोय नगारखाण्याजवळ एक स्वतंत्र इमारत बांधून देऊन केली होती.ही इमारत आज अस्तित्वात नाही. कंपनीचे विशेष भाग्य म्हणजे संगीत सम्राट अल्लादिया खासाहेब त्यांचे बंधू हैदर खा, पुत्र मंजी खा व भुर्जी खा इत्यादी करवीरातील ख्यातनाम लोकांचे कंपनीत नेहमीच येणं जाणं चालत असे. त्यांच्या मार्गदर्शनाचा आणि सहवासाचा फायदा या नाटक मंडळीला होत होता. या कंपनीमध्ये पुढारीकार गणपतराव जाधव यांचे चुलते भाऊराव जाधव, मास्टर कृष्णराव, शंकरराव सरनाईक, गुंडोपंत वालावलकर, बाळकोबा बावडेकर, गोविंदराव देवस्थळी, लक्ष्मण देवळी, पिंगळे, पांडोबा क्षीरसागर, पेठे अशी नाटकांमध्ये रुळलेली नटमंडळी होती. पेटी व तबल्याच्या साथीसाठी राजारामबापू पुरोहित, दादा लाडू ही मंडळी होती. कंपनीने 'मानापमान' 'विद्याहरण' 'संगीत सौभद्र' 'संगीत शाकुंतल' 'रामराज्यभियोग' 'मृच्छकटिक' अशी जुनी संगीत नाटके बसविली होती . त्यासोबतच वासुदेवशास्त्री खरे यांचे

'कृष्णकांचन' व 'चित्रवंचना' तसेच 'शापसंभ्रम' 'मूकनायक' कोल्हटकर यांचे 'मतीविकार' य. ना. टिपणीसांचे 'सिद्धसंसार' त्यासोबतच 'देशदीपक' 'गोरक्षण' 'शिवशंभव' अशी अनेक नाटके बसविलेली होती. १९१९ मध्ये कंपनी इंदौर मुक्कामी असता इंदूरच्या दरबाराला स्वतःची नाटक मंडळी स्थापन करायची होती. त्यामुळे शिवराज मधील बरीच नट मंडळी फुटून इंदौर दरबाराच्या राजश्रयाखाली कोल्हापूरच्या नटमंडळींनी 'यशवंत नाटक मंडळी'ची स्थापना शंकरराव सरनाईक यांच्या नेतृत्वात केली.

**यशवंत नाटक मंडळी (१९१९ -१९३४)**

७ जानेवारी १९१९ रोजी इंदौर येथे सवाई तुकोजीराव होळकर यांच्या खास राजाश्रयाखाली या कंपनीची स्थापना झाली. राजाश्रयाखाली कंपनी असली तरी या कंपनीवर नियंत्रण ठेवणारे खास मंडळ देखील संस्थानाने नेमले होते. इंदूरचे भूगर्भशास्त्रज्ञाच्या हुद्द्यावर असलेले सत्यबोधराव खोदलीकर हे मंडळाच्या डायरेक्टर बोर्डावर होते. कंपनीमध्ये वांग्मय व काव्याचे जाणकार असावेत म्हणून कवी नरहर शंकर रहाळकरांचा समावेश होता. दादा लाडू, राजारामबापू कडू, आबालाल तब्बलजी ही मंडळी होती. जमालबक्ष, अमीरबक्ष आणि खादीम हुसेन अशी सारंगी वादनाचे उत्कृष्ट साथीदार या मंडळीला लाभलेले होते. सवाई तुकोजीरावांनी यशवंत नाटक मंडळीला दिलेला राजाश्रय खरोखरच सवाई पद्धतीचा होता. नाटक मंडळी स्थापन करतेवेळी कंपनीची पहिली सुतळी खरेदी करण्यापासून तो सर्वांग परिपूर्ण नाटक कंपनी उभी करण्यापर्यंतचा सर्व खर्च सढळ हाताने करताना जवळजवळ ५० हजार रुपये खर्च केला होता. 'पुण्यप्रभाव' नाटकाने कंपनीची सुरुवात झाली. परंतु खेळ साधल्याने कंपनीने 'अहिल्याउद्धार' नाटकाचे खेळ केले होते. या कंपनीत शंकरराव सरनाईक, भाऊराव जाधव, गोपाळ जाधव, विसुभाऊ भडकमकर, मास्टर सदाशिव, पांडोबा क्षीरसागर, कृष्णराव गोरे, गणपतराव इंदूरकर, अंतोबा करंदीकर, बाळकृष्ण साठे, सवाई गंधर्व(रामचंद्र कुंदगोळकर), बाळकोबा बावडेकर, दिनकर मंडलिक, वामनराव सडोलीकर, गणपतराव देवासकर, बापूराव पवार अशा नटांचा संच होता. गणपतराव बोडसांचा तालीम मास्तर म्हणून योग लाभला होता. नानासाहेब हर्डीकर, बापूराव पवार हे कंपनीचे व्यवस्थापक होते. १९१९ ते १९२३-२४ पर्यंत कंपनीला इंदौर संस्थानाचा राजाश्रय लाभलेला दिसतो. पुढे शंकररावांनी राजाश्रय कमी झाल्यानंतर हिंमत न हारता स्वतःच्या कौशल्यावर ही कंपनी चालूच ठेवली होती. नंतरच्या काळात नव्याने होळकर संस्थानाने कंपनीला पुन्हा राजाश्रय दिलेला देखील दिसतो. कारण १९३४ च्या सत्यवादी वर्तमानपत्रांमध्ये होऊ घातलेल्या नाट्यप्रयोगाच्या जाहिरातींच्या मथळ्यावर इंदौर महाराज तुकोजीराव होळकर यांच्या खास राजाश्रयाखालील 'यशवंत नाटक मंडळी' अशी जाहिरात पाहायला मिळते.[२५] या वेळच्या कोल्हापूर येथील मुक्कामामध्ये कंपनीने पॅलेस थिएटरमध्ये स. अ. शुक्ल यांचे 'सत्याग्रही' हे नाटक श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज व त्यांची सर्व खाशा स्वाऱ्या समोर हा खेळ सादर केला होता. या नाटक मंडळीने 'संशयकल्लोळ' 'संगीत सौभद्र' 'मानापमान' 'मृच्छकटीक' तसेच मामा वरेरकर यांचे 'चलती दुनिया' गोविंदराव टेंबे यांचे 'संगीत पटवर्धन' 'तुळशीदास' तसेच 'विद्याहरण' सदाशिव अनंत शुक्लांचे 'सौभाग्यलक्ष्मी' बाबासाहेब पांडेंचे 'पुनरागमन' अनंत गद्रे यांचे 'माझा देश' विठ्ठल वामन हडप यांचे 'रायगडाची राणी' अशी नाटके मराठी रंगभूमीवर उत्कृष्टपणे सादर केली होती. याद्वारे शंकरावांनी त्या काळातील व्यावसायिक फायदा तोट्याचा विचार न करता अनेक नवख्या नाटककरांना आपल्या नाटक मंडळीच्या माध्यमातून संधी दिलेली होती. खरंतर मराठी रंगभूमीवर महाराष्ट्र कोकीळ म्हणून नावलौकिक केलेल्या कोल्हापूरच्या शंकरराव सरनाईक यांचा संशोधनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे गरजेचे आहे. वरील नाटक मंडळी प्रमाणेच राजर्षी शाहू कालखंडात कोल्हापूरच्या 'भारतभूषण संगीत नाटक मंडळी' जगतचित्रदर्शक नाटक मंडळी आणि इतर अनेक नाटक मंडळी होऊन गेल्या त्यांनी कोल्हापूरप्रमाणे एकूणच महाराष्ट्राच्या रंगभूमीचा नावलौकिक केला होता.

**राजर्षी शाहूंत्तोर कालखंड (१९२२-१९४९)**

राजश्री शाहू महाराजानंतर कलेच्या अधिष्ठानाला जोपासण्याचे काम पुढील काळात देखील झालेले दिसते. राजर्षी शाहूंच्यानंतर राजाराम महाराज, ताराराणी महाराजांचा रिजन्सी काळ आणि करवीरचे अधिपती शहाजी महाराजांनी देखील नाट्यकलेला प्रोत्साहन आणि आश्रय दिलेला दिसतो. राजाश्रय आणि लोकाश्रेयाच्या मिश्र प्रतिसादातून या काळातील नाट्यकला बहारीस आलेली दिसते. नानासाहेब चापेकरांनी पुनरुज्जीवित केलेल्या 'किर्लोस्कर नाटक कंपनी'ला व गंगाधरपंत लोंढे यांनी स्थापन केलेल्या 'राजाराम संगीत मंडळी'ला राजाराम महाराजांनी खास राजाश्रय दिला होता. त्यासोबत ताराराणी महाराजांच्या रिजन्सी कालखंडामध्ये देखील नाट्यकलेला प्रोत्साहन मिळावे म्हणून 'बालमोहन संगीत मंडळी'ला राजाश्रय दिला होता. करवीरच्या नाट्य परंपरेच्या बाबतीत हा काळ मिश्र प्रतिसादाचा दिसत असला तरी दुसऱ्या बाजूने चित्रपटासारख्या यांत्रिक कलेचा विकास झाल्याने संपूर्ण महाराष्ट्र पातळीवर ही कला पठारावस्थेला पोहोचत असलेली दिसते. अर्थात, राजश्री शाहू महाराजांच्या कालखंडापासून नाट्य सेवा करणाऱ्या जुन्या नाटक मंडळया या काळात देखील तग धरून होत्या. ललितकलादर्श, यशवंत नाटक मंडळी या जुन्या नाटक मंडळींनी नाट्य सेवा अविरत सुरू ठेवली होती. या जुन्या नाटक मंडळींसोबतच पुढील पिढीतील नट, नाटककार, नाटक मंडळयादेखील या काळात उदयास आल्या. सिनेमा आणि नाट्यपरंपरा दोन्हीची काही प्रमाणात सांगड घालून दोन्ही कलापरंपरा टिकवण्याचा प्रयत्न या कालखंडात स्थानिक नाटक मंडळी, चित्रपट कलाकारांच्या सहभागाने नाटक मंडळया, ग्रामीण नाट्य संस्था, शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रातील संस्थांनी देखील या काळातील नाट्य परंपरा जपण्याचे कार्य केले. या काळातील दुसरी बाब दखल घेण्याजोगी दिसते ती म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र पातळीवर चित्रपटाच्या उदयामुळे महाराष्ट्राचे नाट्य परंपरेला एक प्रकारची अवकाळी आली होती. पुण्याच्या नाट्यमण्वंतराने मराठी रंगभूमीचा पडता काळ सावरण्याचा प्रयत्न केलेला दिसतो त्याप्रमाणेच महाराष्ट्राची रंगभूमी जिवंत ठेवण्याचे चिरंतन कार्य या काळात करवीरच्या नाट्यपरंपरेने देखील केलेले दिसते. याची

दखल मराठी रंगभूमीचा इतिहास लिहिताना घेतली पाहिजे. या काळातील महाराष्ट्र नाटक मंडळी, सदभावना नाटक मंडळी, सोशल ड्रमॅटिक सर्कल, हिंद नाटक समाज, प्रभाकर नाटक मंडळी, करवीर नाटक मंडळी, ललित कुमार नाटक मंडळी यांनी हा काळ गाजवलेला दिसतो. शिवाय या कालखंडापूर्वी स्त्रियांनी नाटकांमध्ये कामे करणे कमी प्रतिष्ठेचे मानले जात होते. परंतु राजर्षी शाहुत्तोर कालखंडात स्त्री शिक्षण आणि प्रबोधनाची चळवळ तळागळात पोचल्यामुळे जुन्याधारणा लोपपावत चालल्याने स्त्रिया देखील चित्रपट, नाटकांमध्ये कामे करू लागलेल्या दिसतात. महाराष्ट्राच्या रंगभूमीच्या इतिहासात एका स्त्रीने चालवलेली आणि महिला कलाकाराच्या नावाने नाटक मंडळी चालवली गेल्याची दुर्मिळता आपणाला करवीरच्या नाट्यपरंपरेमध्ये पाहायला मिळते. हा योग कोल्हापूरच्या सुलोचना पालकर आणि अहमदनगरचे प्रसिद्ध गायक नट पंडितराव नगरकर यांच्याद्वारे स्थापन झालेल्या सुलोचना नाटक मंडळीच्या माध्यमातून पाहायला मिळतो.

**सुलोचना नाटक मंडळी (१९३४)**

प्रभात फिल्म कंपनीच्या निमंत्रणावरून कोल्हापुरात पंडितराव नगरकर आले असता देवल क्लबच्या मदतीकरिता चित्रपटसृष्टीतील कलाकारांनी 'संशयकल्लोळ' नाटकाच्या प्रयोगात पंडितराव आणि सुलोचना पालकर यांनी कामे केली होती. लोकांना हा प्रयोग प्रचंड आवडला. अर्थात, नाटकातील स्त्रियांची कामे स्त्रियांनीच करणे ही धारणा अजून म्हणावी तेवढी रुजली नव्हती. परंतु, या प्रयोगातून त्याची परिणामकारकता दिसून आली. याच योगातून १९३३ मध्ये ही नाटक मंडळी अस्तित्वात आली.[२६] त्याकाळचे नाटकाचे प्रसिद्ध ठेकेदार श्रीपाद उपरे यांच्याशी मुंबईमध्ये तीन महिने प्रयोग करण्याचा करार करून या कंपनीने नाटकांचे अनेक प्रयोग गाजविले होते. काकासाहेब खाडीलकरांचे 'बायकांचे बंड' 'त्रिदंडी सन्यास', वीर वामनराव जोशी यांचे 'रंकाची राणी', ना .सी. फडके लिखित 'संगीत संजीवन' रा. दि. करंदीकर यांचे 'पुण्याची मुलगी' गो.ब. देवलांचे 'मृच्छकटिक' अशी अनेक जुनी व नवीन नाटके या कंपनीने गाजवलेली दिसतात.

२८ आणि २९ जून १९३४ रोजी या मंडळीने संस्थानाचे पंतप्रधान दादासाहेब सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली ना.सी. फडके लिखित 'संगीत संजीवन' हे नाटक सादर केले होते. अर्थात, तत्कालीन काळात कोल्हापूरच्या सुलोचना पालकर यांच्यावर टीका होत असे की, सुलोचना पालकर या बालगंधर्वांची निव्वळ नक्कल करतात. हे खोडण्यासाठी ही कंपनी सादर होणारे प्रयोगाच्या प्रसिद्धी पत्रामध्येच "कोण म्हणतो मी सुलोचना पालकर म्हणजे नुसती बालगंधर्वांची नक्कल ?" अशी टॅगलाईनच असे.[२७] यावरून बालगंधर्वांची महाराष्ट्राच्या रसिकांवर त्यांच्या अभिनयाची भुरळ देखील लक्षात येते. पंडितराव नगरकर आणि सुलोचना पालकर यांच्या बहारदार गायन आणि नाट्य अभिनयातून हे नाटक प्रसिद्धीस आले होते. कादंबरीकार वि. स. गुर्जरांना २८ जून १९३४ रोजी लिहिलेल्या पत्रात ना.सी. फडके लिहितात "संजीवन नाटक रंगभूमीवर यशस्वी झाले मी निश्चित आहे की हे नाटक पुणे मुंबई या ठिकाणी खूप चालेल."[२८] पुढे ते या पत्रात सुलोचना पालकरांच्या कामाबद्दल खुश होऊन मराठी रंगभूमीवर नाटक आणि सुलोचनाचे नाव स्मृतित राहील अशी स्तुती करताना दिसतात. परंतु सद्यस्थितीला सुलोचना पालकर नावाची कोल्हापूरची एक नाट्य कलाकार होऊन गेली याचा नामोउल्लेख देखील पाहायला मिळत नाही. सुलोचना पालकर यांनी थोडक्यात कालखंडामध्ये मराठी रंगभूमीची सेवा केली. कालबाह्य सामाजिक धारणांना न जुमाणता नाटकांमध्ये कामे करून पुढील पिढीला सहभागी होण्याचा दिलेला संदेश नोंद घेण्याजोगा आहे.

**कोल्हापूरच्या नाट्यपरंपरेचा विकास करणाऱ्या संस्था**

कोल्हापूरचा आत्तापर्यंतचा अभ्यास करताना केवळ अशा नाटक मंडळी ज्या गावोगावी जाऊन व्यावसायिक दृष्टिकोनातून नाटकांचे खेळ सादर करत असत यांचाच आढावा घेऊन चालत नाही. प्रत्यक्षात विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकानंतर आणि त्यापूर्वीपासूनच नाट्य क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या नाटक मंडळी, हौशी मंडळी, औद्योगिक, सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांचा देखील अभ्यास करावा लागतो. यावरून करवीरच्या नाट्यपरंपरेची खोली आणि व्यापकतेचा अंदाज येऊ शकेल.१८८३ रोजी कोल्हापूरमध्ये 'कोल्हापूर गायन समाजा'ची स्थापना झाली. १९४६ मध्ये या समाजाचे विलीनीकरण 'देवल क्लब' मध्ये करण्यात आले.[२९] खऱ्या अर्थाने रसिक जणांसाठी संगीतदर्शनाचे आयोजन करून संगीताचे सार्वत्रिकरण करणारी भारतातील एकमेव संस्था असावी. अन्यथा परंपरेनुसार संगीत, नृत्य व इतर कला या राजदरबारात व धनीकांच्या पुरत्याच मर्यादित होत्या. त्यामुळे नवशिक्षित तरुणांना व सामान्यांसाठी राजदरबारी पडद्यांना ओलांडून कलेचे सामान्यीकरण करणारी आधुनिक काळातील संगीत सभा हीच ठरली असावी. या सभे मार्फत संगीता सोबतच नृत्य, गायन आणि नाट्यकलेची देखील जोपासणा होत आली.

**राजाराम कॉलेज आणि नाट्य चळवळ**

१८८० मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेला खूप मोठा वारसा लाभलेला दिसतो. संपूर्ण भारतातून या संस्थेमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत असत. प्रिन्सिपल कॅन्डी( १८८०-९९ )पासून डॉ. व्ही. के. गोकाक (१९४९-५२) पर्यंत अनेक देशी-विदेशी दिग्गज प्राचार्य या संस्थेस लाभले. या संस्थेतील अभ्यासपूर्ण कार्यक्रमासोबत स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून सादर होत असलेली मराठी, हिंदी, कन्नड, इंग्रजी अशा विविध भाषेतील नाटके बसवून कित्येक महिने सरावाच्या तालमीने घेऊन सादर होत असत.[३०] शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून नाट्य चळवळीस उभारी देण्यासाठी कोल्हापूरचे नाट्य कलाकार राजाराम कॉलेजमधील नाटके बसवण्यासाठी मदत करत. नारायणराव घोरपडे, डी. वायकूळ,दत्तोबा भोसले,शंकरराव सरनाईक, वसंतराव कोडोलीकर, झुंजारराव पवार, ना.सी. फडके अशी अनेक मंडळी नाटके बसवून घेत व दिग्दर्शन करीत असत. अभ्यासाखेरीज विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे 'नाट्य

संगीत सभा' कार्यरत होती. या सभे मार्फत प्रत्येक टर्मला एक नाटक, एक गाणं, एक व्याख्यान, एक व्हरायटी शो, एक पेंटिंग( प्रात्यक्षिक), एक नृत्य व इतर कार्यक्रम सादर होत असत. यातूनच पुढे चित्रपट आणि नाट्यकलेतील अनेक दिग्गज कलाकार देखील उदयास आलेले दिसतात. याशिवाय शैक्षणिक संस्थांनी करवीरची नाट्य परंपरा जोपासण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणाऱ्या संस्थांमध्ये विद्यापीठ हायस्कूल, गर्ल्स हायस्कूल, नागोजीराव पाटणकर हायस्कूल, प्रिन्स शिवाजी विद्यालय यांनी देखील ही परंपरा जोपासण्याचे कार्य केलेले दिसून येते.

**करवीर भगिनी मंडळ ,कोल्हापूर**

१९३४ रोजी श्यामाबाई मोरुसे यांच्या प्रेरणेने स्थापन झालेली. महिला सबलीकरण करणारी ही सेवाभावी संस्था होती.[३१] या संस्थेमार्फत देखील वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेतील महिलांच्या सहभागातून अनेक नाटके सादर होत असत. १९४२ रोजी या संस्थेने महाराणी ताराबाई छत्रपती महाराज यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडलेल्या महिला परिषदेनिमित्तमध्ये ना.धो. ताम्हणकर लिखित 'नव्या जुन्या' या विनोदी नाटकाचे प्रयोग केले होते.[३२] या पुढील काळात देखील संस्थेमार्फत अनेक नाटके सादर झालेली दिसतात.

**करवीरमधील ग्रामीण नाट्य चळवळीची परंपरा**

राजर्षी शाहुत्तोर कालखंडानंतर कोल्हापूरच्या ग्रामीण परिसरामध्ये देखील प्रसंगीत स्वरूपात नाटके सादर करण्याची परंपरा सुरू झालेली दिसते. गावच्या यात्रा, मेळे, सण उत्सवानिमित्त देखील या हौशी ग्रामीण नाटक मंडळी नाटके सादर करत असत. या नाटकांच्या सहभाग आणि सादरीकरणामध्ये व्यावसायिकतेपेक्षा उच्च अभिरुची आणि करमणूक हा हेतू दिसून येतो. प्रसंगरूपी या नाट्यसंचांनी सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न देखील केलेला दिसतो. नाटकांचे काही खेळ करून मिळणारे उत्पन्न सार्वजनिक हितासाठी दिले गेले. संस्थानकालीन कोल्हापूरच्या गडहिंग्लज पेट्यामध्ये १४ मे १९४१ रोजी येथील 'नवयुग विद्यार्थी मंडळा'मार्फत 'घुगरे वाडा' येथे 'कॉलेज कुमारी' या संगीत नाटकाचा प्रयोग सादर झाला.[३३] या मंडळीचे चालक अध्यक्ष डॉ.गुणे व सदस्य मा.नि.सोलापुरे, रामभाऊ रेळेकर यांच्या प्रचारातून हे नाटक सादर झाले होते. शिवाय मौजे लाट सारख्या छोट्या खेड्यांमध्ये देखील नाट्य चळवळीचे लोण पसरलेले दिसून येते. या ठिकाणी रेड क्रॉस फंडाच्या निधी उभारणीसाठीच्या प्रसिद्धी पत्रकाचा वापर करून लाट, शिरढोण, शिरदवाड, रांगोळी, जंगमवाडी येथील नागरिकांना फंडासाठी आवाहन करून भारत सेवक नाटक मंडळी ने 'वीरराणी कित्तूर रुद्रमा' हे नाटक ६ मे १९४४ रोजी खास युद्ध फंडाच्या संकलनासाठी बसविले होते.[३४] याच हेतुने गडहिंग्लज पेट्यामधील 'म्युझिकल सर्कल' या मंडळीने १३ मे १९४४ रोजी रेड क्रॉस फंडाच्या निधी संघटनासाठी पॅलेस थिएटरमध्ये 'संगीत कालाचा संदेश' नाटक बसवून निधी संकलन केलेले दिसते. त्यामुळे या काळात कोल्हापूर शहर आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये नाट्य रूची खोलवर रुजलेली दिसते.

**दि कोल्हापूर शुगर मिल्स लि. आणि नाट्य चळवळ**

१९३२ रोजी स्थापन झालेल्या या औद्योगिक संस्थेने आर्थिक क्षेत्रातील भरारी सोबतच टेनिस, क्रिकेट, जनरल खेळ, देशी खेळा सोबतच भगिनी मंडळ, शिरीष मंडळ आणि जीवन कल्याण सारख्या क्रीडा, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विभागांच्या माध्यमातून संस्थेने सांस्कृतिक परंपरा जोपासली होती. मॅनेजिंग डायरेक्टर मदनमोहन लोहिया यांच्या प्रोत्साहनातून शुगर मिलच्या 'जीवनकल्याण'या सांस्कृतिक विभागामार्फत दरवर्षी गणेशोत्सव व इतर कार्यक्रमानिमित्त मिलमधील फिरत्या रंगमंचावर किंवा पॅलेस थिअटरमध्ये येथील कर्मचारी, स्थानिक हौशी कलाकार, नाट्य कलाकार यांच्या माध्यमातून नाटके सादर करीत असत.[३५] ही परंपरा स्वतंत्र्योत्तर कालखंडामध्ये देखील अविरतपणे सुरू ठेवली होती.

**सारांश**

कोल्हापूरच्या नाट्यपरंपरेला समृद्ध वारसा लाभलेला आहे. भारतात ब्रिटिश सत्तेची पाळीमुळे रुजली होती अशा काळात भारतातील राजे ब्रिटिशांचे मांडलिकत्व पत्करून मर्यादित अधिकार बाळगून राज्य करीत होते अशा राजकीय दृष्ट्या एकछत्री अंमल निर्मितीच्या काळात मराठी रंगभूमीची पायाभरणी विष्णुदास भावे यांनी सांगली सारख्या संस्थानी प्रदेशात केली होती. भावे यांच्या अनुकरणातून कोल्हापूरच्या नाट्यपरंपरेचे बिजारोपण शिवाजी महाराज तिसरे ते दिवाण बर्वेंच्या संमिश्र काळात सुरू झाले असे असले तरी राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीत त्यांच्या कला व क्रीडा विषयक नितीमुळे राजाश्रय व लोकाश्रयाच्या मिश्र प्रतिसादातून कोल्हापूर संस्थानातील मराठी रंगभूमी उत्कर्ष पावली असल्याने त्यांच्या कारकिर्दीचा काळ नाट्यकला विकासातील प्रातिनिधी मानला जाऊ शकतो.विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांमध्ये तर कोल्हापूरच्या नाट्यपरंपरेचा नावलौकिक करणाऱ्या ख्यातनाम नाटक मंडळ्या रंगकर्मी, व्यवस्थापक, संगीत दिग्दर्शक, रंगपट निर्माते अशा कलाकारांनी लक्षणीय उंची गाठलेली दिसते. या काळात प्रत्येक कलेच्या स्वरूपातील बदलांना एक भक्कमपणा येऊन राजाश्रया व्यतिरिक्त कलेला आलेले व्यावसायिक रूप नाटक मंडळ्याचे सहकारी व भागीदारी तत्त्व, फिरत्या स्वरूपातील नाटक मंडळ्याना उपलब्ध झालेली दळणवळणाची आधुनिक साधने अशा अनेक कारणांमुळे ही कला अधिक गतिमान आणि व्यापक झालेली दिसते. राजर्षी शाहुत्तोर कालखंडात देखील हे कलेचे अधिष्ठान किंचितही ढळले नाही. यावेळी आधुनिक काळातील तंत्रज्ञानात्मक बदलामुळे विशेषतः चित्रपट कलेच्या विकासामुळे महाराष्ट्र पातळीवर मराठी रंगभूमीची पीछेहाट झाली. परंतु करवीरच्या नाट्यपरंपरेचा सखोल अभ्यास केल्यास आपणाला हे स्पष्ट दिसून येते की, या कलेचे संस्थानामध्ये सार्वत्रिकरण होऊन ही कला तळगळात पोचली होती. कोल्हापुरातील देवल क्लब सारख्या जुन्या संस्था,

राजाराम कॉलेज आणि इतर शैक्षणिक संस्था, शुगर मिलसारखी औद्योगिक संस्था,करवीर भगिनी मंडळसारख्या सामाजिक संस्था आणि खेडोपाडी पोचलेली ग्रामीण नाट्य चळवळीचा आढावा घेतला तर आपणाला असे दिसून येते की, विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकानंतर महाराष्ट्र पातळीवर पीछेहाट झालेली मराठी रंगभूमीला चिरंतर ठेवण्याचे दिव्य कोल्हापूरच्या नाट्यपरंपरेने पार पाडले. याची दखल महाराष्ट्राच्या नाट्यपरंपरेच्या इतिहासात घेतली पाहिजे.

**संदर्भ सूची:**

१.Bhagwat Achut Keshav (Edi.),Maharashtra-A Profile,V.S.Khandekar Felicitation Volume,Y.S. Khandekar Amrit Mahotsav Samiti,Kolhapur,1977,P.251-283.
२. दैनिक पुढारी, दिवाळी अंक,१९६७, पृ. क्र.४२
३. कुलकर्णी आप्पाजी विष्णू, मराठी रंगभूमि, आर्यभूषण छापखाना, पुणे,१९०३, पृ. क्र. १७
४. उपरोक्त, कुलकर्णी, १९०३, पृ. क्र. २३,२४
५. राणे अमरसिंह, खणे बी.डी.( संपा.), युगयुगीन करवीर इतिहास दर्शन, भा.इ.सं. समिती, कोल्हापूर, २०१० पृ.क्र.
६. उपरोक्त, कुलकर्णी, १९०३, पृ. क्र. २५
७. मोटे ह.वि., (संपा), विश्रब्ध शारदा ,खंड २, ह.वि. मोटे प्रकाशन ,मुंबई ,१९७५ ,पृ. क्र,१३
८. Dasgupta,Hemendranath,The Indian Stage,Vol-III,Metropolitan Printing & Publishing House Ltd.,Calcutta,1944,p.203.
९. उपरोक्त, मोटे, १९७५, पृ. क्र. १५,१६
१०.कित्ता, पृ.क्र.१६
११. कित्ता. पृ. क्र.१७
१२. कित्ता, पृ. क्र. १३
१३. वरखेडे,रमेश,नारायण,महाराष्ट्राच्या सामाजिक-सास्कृतिक स्थित्यतरांचा इतिहास,खंड १,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,२०१८, पृ. क्र. ८९८
१४. स्मरणिका,करवीरची नाट्य परंपरा,५१ वे नाट्य संमेलन,कोल्हापूर, १९७०, पृ. क्र. १६
१५. कुलकर्णी उदय, काळीज खुणा,राव प्रकाशन,कोल्हापूर,२०२१, पृ. क्र. ३६
१६. दैनिक पुढारी, २५ डिसेंबर १९४३
१७. सुंठणकर स. र.( ले. व संग्रहक), दत्तोपंत हल्याळकर स्मारक ग्रंथ, नाट्य प्रकाशनमाला, बेळगाव,१९४४
१८. बोडस, ग. गो., माझी भूमिका, व्हीनस बुक स्टॉल, पुणे, १९६४, पृ. क्र. २६
१८. वरेरकर भा.वि., माझा नाटकी संसार, खंड एक, स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९४१, पृ. क्र.२१
१९. दैनिक प्रभात, दिवाळी अंक, १ नोव्हेंबर १९४५
२०. करवीर सरकारचे जनरल ठराव बुक क्रमांक ७१, पुराभिलेखागार कोल्हापूर, पृ. क्र. १०
२१. देसाई व., शा., मखमलीचा पडदा, पदमजा प्रकाशन, बडोदे, १९४७, पृ. क्र. ६८
२२. कारवार ,कृष्णा (संपा.),वरेरकर भा.वि. (ले.), माझा नाटकी संसार, खंड चार,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९५,पृ. क्र.५१२
२३. टेंबे, गोविंदराव, माझा जीवन विहार ,दि भारत बुक स्टॉल, कोल्हापूर, १९४८,पृ.क्र. १८४
२४. उपरोक्त, दैनिक पुढारी,१९६७, पृ. क्र. ४४,४५
२५. दैनिक सत्यवादी, २७ जून १९३४
२६. गाडगीळ वा. य., हिरव्या चादरीवर, भाग १, वसंत बुक स्टॉल, मुंबई ,१९२१ पृ. क्र. १२१,१२२
२७. दैनिक सत्यवादी, २७ जून १९३४
२८. उपरोक्त मोटे,१९७५ , पृ. क्र. ६२
२९. साळुंखे पी. बी.,( संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, १९७६, पृ.क्र. १११-११६
३०. स्मरणिका, शताब्दी महोत्सव, १८८०-१९८०, राजाराम महाविद्यालय, १९८०, कोल्हापूर ,पृ.क्र.७२-७५
३१. स्मरणिका, करवीर भगिनी मंडळ ,१९३४-१९९४,पृ. क्र. ५
३२. दैनिक पुढारी, ७ मे १९४२
३३. दैनिक पुढारी, १७ जून १९४१
३४. दैनिक पुढारी, ९ मे १९४४
३५. घाटे दि.वा.,(संपा.),जीवन कल्याण, जीवन कल्याण प्रकाशन, कोल्हापूर, शुगर मिल्स लि., कोल्हापूर, १९५८